# जळगाव शहर महानगरपालिका शिक्षण विभाग,जळगाव

ज.श.म.न.पा.शिक्षण मंडळ कार्यालय, नटवर टॉकीज मागे, जळगाव -425001 ☎ - 0257-2226533
ईमेल - ssamncjalgaon@gmail.com

जा.क्र.जशमनपा/शिक्षण/समायोजन/2023/५६ दि.15/05/2023.

प्रति,

मुख्याध्यापाक / शिक्षक,

सर्व म.न.पा.प्राथ.शाळा,जळगाव.

विषय :- सर्वसाधारण /प्रशासकीय /विनंती बदली बाबत.

संदर्भ:- 1) सन 2006 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.21:महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005.

2) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2017/प्र.क्र.415/ कार्यासन 12 दि.09/04/2018.

परिपत्रक :-

उपरोक्त संदर्भिय शासन अधिसूचना आणि शासन निर्णयानुसार जळगाव महानगरपालिका शिक्षण विभाग सेवेतील मुख्याध्यापक व शिक्षकांची सर्वसाधारण बदली माहे मे 2023 मध्ये करण्याचे प्रस्तावीत आहे.

विद्यमान कार्यरत पदावर ज्या कर्मचाऱ्यांना किमान पाच वर्ष व त्यापेक्षा अधिक कालावधी झाला आहे असे कर्मचारी अशा सर्वसाधारण बदलीस पात्र मुख्याध्यापक व शिक्षकांची यादी सोबत जोडलेल्या परिशिष्ट"अ" मध्ये आणि रिक्त पदांची यादी परिशिष्ट"ब" मध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे.

**उपरोक्त संदर्भिय शासन अधिसूचना क्र.1 व शासन निर्णय क्र.2 मधील तरतूदी नुसार कार्यरत पदांच्या 30% च्या मर्यादेतील बदलीपात्र कर्मचारी यांची रुजू दिनांकाच्या जेष्ठतेनुसार यादी परिशिष्ट "अ" मध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे. सबब परिशिष्ट "अ" मधील सर्वसाधारण बदलीने रिक्त होणाऱ्या तसेच परिशिष्ट "ब" मधील रिक्त पदांच्या अनुषंगाने बदलीपात्र कर्मचारी यांनी आपले पसंतीक्रम सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात (आवश्यक कागदपत्रांसह) दिनांक 24/05/2023 रोजी सायंकाळी 05:00 वाजेपर्यंत शिक्षण विभाग कार्यालयात सादर करावे.**

सदरचे परिपत्रक शिक्षण विभाग कार्यालयाच्या दर्शनी भागावर तसेच मुख्याध्यापकांना उपलब्ध करुन देण्यात येत असून त्याकरीता स्वतंत्र पत्र निर्गमीत केले जाणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. संबंधीत कर्मचारी यांनी आपले पसंतीक्रम मुळ अर्ज प्रत्यक्ष म.न.पा.शिक्षण विभाग कार्यालय नवीपेठ, जळगाव येथे अथवा ssamncjalgaon@yahoo.com या ई-मेलवर (स्वाक्षरी केलेला पसंतीक्रम नमुना व कागदपत्रे केवळ PDF स्वरुपातच) विहीत मुदतीत सादर करावे.

तसेच विहीत नमुन्यात कोणताही पसंतीक्रम न देता प्राप्त होणाऱ्या अथवा पसंतीक्रम नमुना स्वाक्षरीकृत न केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रशासकीय सोईनुसार पदस्थापना देण्यात येईल.

प्रसिध्द केलेली रिक्त पदे/ बदलीपात्र कर्मचारी यांची पदे जर माहे मे 2023 च्या सर्वसाधारण/ प्रशासकीय बदली आदेश निर्गमीत होण्यापूर्वी विनंता/अंशत: बदल /पदोन्नतीने अथवा अन्य कारणामुळे भरली गेली तर प्रस्तुत पदांकरीता दिलेला पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

बदली ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याने राजकीय दबाव वापरल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1981 मधील नियम क्र.23 चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

**उपायुक्त(आस्थापना)**
**जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव**

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

1) मा.आयुक्त, ज.श.महानगरपालिका,जळगाव.

2) मा.अतिरिक्त आयुक्त, ज.श.महानगरपालिका,जळगाव.

3) सहा.आयुक्त (शिक्षण), ज.श.महानगरपालिका,जळगाव.

प्रत कार्यवाहीस्तव,

1) प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण विभाग,जळगाव.

## परिशिष्ठ - 1 सोबतचे विवरणपत्र -1

सर्व साधारण / प्रशासकीय/ विनंती बदलीचा अर्ज

दिनांक :- / /2023.

प्रति,

मा.आयुक्त सो,

ज.श.महानगरपालिका, जळगाव.

विषय :- सर्व साधारण / प्रशासकीय/ विनंती बदलीचा पसंतीक्रम विचारात घेणेबाबत.

महोदय,

सर्व साधारण / प्रशासकीय/ विनंती बदली करीता मी खालील प्रमाणे माहिती सादर करीत आहे.

1) आवश्यक वैयक्तीक माहिती :-

i. नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदनाम :- . . . . . . . . . . . . . . .

ii. सध्याची शाळा :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . बदली / नेमणूक आदेश दिनांक :- . . . . . . . . . . . सध्याच्या शाळेत रुजू दिनांक . . . . . . . . . . . .

iii. संवर्गातील प्रत्यक्ष नियुक्ती दिनांक :- . . . . . . . . . . . . . जन्म दिनांक . . . . . . . . . . . . सेवानिवृत्ती दिनांक :- . . . . . . . . . . . . . .

iv. शिक्षण :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

v. विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत आहे का? होय / नाही (असल्यास सविस्तर तपशील द्यावा.

2) आजपर्यंतच्या पदस्थापनांचा तपशील -

| अ.क्र. | शाळेचे नाव | सेवेचा प्रकार (नियमीत) | कधी पासून | कधी पर्यंत | कालावधी वर्ष/महिने |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

3) कर्मचारी बदलीपासून सुट मिळण्यास पात्र असल्यास त्याबाबतची कारणे - . . . . . . . . . . . . . . . . . . .

4) सर्वसाधारण बदली कोणत्या ठिकाणी करावी या बाबतचे कमाल 10 पसंतीक्रम.

| अ.क्र. | पसंतीक्रम |
|---|---|
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |
| 6 | |
| 7 | |
| 8 | |
| 9 | |
| 10 | |

कर्मचारी नाव / स्वाक्षरी